आर.सी.सी क्र. ७९०/२०२५
सरकार विरुध्द हर्षकुमार
**निशाणी क्र. ५५/ क**

**अभियोग पक्षा तर्फे साक्षीदार क्रमांक–१ यांची जबानी–**
मी प्रतिज्ञापुर्वक शपथेवर निवेदन करतो की,
**माझे नाव — श्री. तेजस दिपक कुलकर्णी,**
वय — ३६ वर्षे,
व्यवसाय — नौकरी क्रिडा अधिकारी, उप संचालक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर विभाग, छ. संभाजीनगर.
निवासस्थान– नंदीग्राम सोसायटी, गजाजन महाराज मंदीराजवळ, इस्सार पेट्रोल पंपाजवळ गारखेडा परिसर, छ. संभाजीनगर.

---

**सरतपासणी अभियोग पक्षा करीता**
**विद्वान श्री. ए. झेड. काझी, सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे द्वारा –**

**१.** दिनांक ०५.०७.२०२४ रोजी मी विभागीय उप संचालक कार्यालयात क्रिडा अधिकारी म्हणून छत्रपती संभाजीनगर येथे कर्तव्यावर रूजु झालो. मी श्री. संजय सबनीस यांना ओळखतो. ते मी कर्तव्यावर रुजू झालो त्यावेळेला उपसंचालक म्हणून नियुक्त होते. जा.क्र. उसंछसं/क्रिडासंकुल/बँक खाते/२०२४–२५/३४०, दिनांक २०.१२.२०२४ रोजीच्या पत्राआधारे मला श्री. संजय सबनिस, उपसंचालक यांनी फिर्याद दाखल करण्याकरीता प्राधिकृत केले. हे पत्र मला आता दाखविले. या पत्रावर श्री. संजय सबनिस यांची सही आहे. ही सही मी ओळखतो, कारण श्री. संजय सबनिस हे माझे वरिष्ठ अधिकारी होते. या पत्रातील मजकुर खरा व बरोबर आहे. या पत्रास **निशाणी क्रमांक ५६** देण्यात येत आहे. दिनांक ०७ सप्टेंबर, २०२३ रोजी श्री. सबनिस यांना अतिरीक्त कार्यभार छत्रपती संभाजीनगर विभाग क्रिडा संकुल येथे उप संचालक म्हणून दिलेला होता.

**२.** महाराष्ट्र राज्य क्रिडा धोरणानुसार सन २००१ मध्ये महाराष्ट्र सरकारने प्रत्येक तालुका, जिल्हा व विभाग येथे क्रिडा संकुल उभा करण्याविषयी महाराष्ट्र स्पोर्टस इन्फ्रास्टकर्चस नुसार निर्णय घेतला होता. दिनांक २६ मार्च, २००३ रोजी शासनाने या धोरणाचे शासन निर्णय काढले. मी फिर्याद दाखल करतांना हा दिनांक २६.०३.२००३ रोजीचा शासन निर्णय दिलेला आहे. हा शासन निर्णय मला आता दाखविला. तो बरोबर आहे. या शासन निर्णयास **निशाणी क्रमांक ५७** देण्यात येत आहे. दिनांक ३१ ऑगस्ट, २०२० रोजी विभागीय क्रिडा संकुल समितीची फेर रचना झाली. या फेर रचनेमध्ये जिल्हयाचे पालक मंत्री हे क्रिडा संकुलाचे अध्यक्ष

आर.सी.सी क्र. ७९०/२०२५
सरकार विरुध्द हर्षकुमार
**निशाणी क्र. ५५/ क**

म्हणून नियुक्त करण्यात आले. या समितीचे उपाध्यक्ष म्हणून विभागीय आयुक्तांची नियुक्ती करण्यात आली होती. या समितीमध्ये सदस्य–सचिव म्हणून उप संचालक, क्रिडा व युवक सेवा यांची नियुक्ती करण्यात आली होती. या विषयीचे शासनाचे निर्णय मी पोलीसांना दिला होता. तो मला दाखविला. तो हाच आहे. या शासन निर्णयास **निशाणी क्रमांक ५८** देण्यात येत आहे.

**सहाय्यक सरकारी वकीलांच्या तोंडी विनंतीवरून उर्वरीत सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

समक्ष
**–/स्वाक्षरीत/–**
( श्री. आर. एस. जांबोटकर )
मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद
दिनांक– ०३/०५/२०२५

श्रवणोत्तर स्वीकृती.
**–/स्वाक्षरीत/–**
( श्री. आर. एस. जांबोटकर )
मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद